**ठळक बातम्या**

- केंद्रीय निवडणूक आयोग आज महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकींच्या कार्यक्रमाची घोषणा करणार.

- देशाच्या कानाकोपऱ्यातल्या नागरिकांपर्यंत सोयी सुविधा पुरवण्यासाठी भारतानं डिजिटल यंत्रणांचा प्रभावी वापर केल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- विधान परिषदेवरच्या राज्यपालनियुक्त ७ सदस्यांनी आज घेतली शपथ

- जम्मू-काश्मिरमधल्या नव्या सरकारचा उद्या शपथविधी

**आणि**

- परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आज दोन दिवसीय दौऱ्यासाठी इस्लामाबादला रवाना होणार

<><><><><><>

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकींची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोग आज करणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोग दुपारी साडेतीन वाजता नवी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत या दोन्ही राज्यांचं निवडणूक वेळापत्रक जाहीर करेल. त्यानंतर लगेचच आचारसंहिता लागू होईल.

महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ पुढील महिन्याच्या २६ तारखेला तर झारखंडचा जानेवारीच्या ५ तारखेला संपणार आहे. २०१९ मध्ये राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २१ ऑक्टोबर रोजी मतदान होऊन २४

ऑक्टोबरला मतमोजणी झाली होती. त्यावेळी ६१ पूर्णांक ४ शतांश टक्के मतदान झालं होतं.

<><><><><><>

देशाच्या कानाकोपऱ्यातल्या नागरिकांपर्यंत सोयी सुविधा पुरवण्यासाठी डिजिटल यंत्रणांचा प्रभावी वापर भारतात सुरू असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. ITU अर्थात आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेच्या जागतिक दूरसंचार मानकीकरण परिषदेच्या उद्घाटनसत्रात ते बोलत होते. आशिया प्रशांत क्षेत्रात पहिल्यांदाच ही परिषद होत आहे. ८ व्या इंडिया मोबाइल काँग्रेसचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

दूरसंचार आणि संबंधित तंत्रज्ञान क्षेत्रांचा विचार करता भारतात सध्या मोठ्या प्रमाणात घडामोडी घडत आहेत. भारतात १२० कोटी मोबाइल वापरकर्ते, ९५ कोटी इंटरनेट वापरणारे असून जगातल्या डिजिटल व्यवहारांमधले ४० टक्के व्यवहार भारतात होतात असं ते आज म्हणाले. स्वस्तातली उपकरणं, कानाकोपऱ्यात संपर्क यंत्रणा, परवडणाऱ्या दरात डेटा आणि डिजिटल होण्याला प्राधान्य या ४ स्तंभांवर भारताचं डिजिटल धोरण अवलंबून असल्याचं त्यांनी सांगितलं. जगभरातल्या १९० देशातले ३ हजारांहून अधिक तज्ञ या परिषदेत सहभागी झाले आहेत.

<><><><><><>

भारत आणि अल्जेरियामध्ये अधिकाधिक आर्थिक भागिदारी वाढवण्यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भर दिला आहे. द्विपक्षीय संबंध आणखी बळकट करणं आणि सहकार्यासाठी नवनवीन मार्गांचा अवलंब

करण्याचं आवाहन त्यांनी केलं. अल्जेरियाची राजधानी अल्जियर्समध्ये काल त्या अल्जेरिया-भारत आर्थिक फोरमला संबोधित करत होत्या.

<><><><><><>

विधान परिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ७ सदस्यांनी आज शपथ घेतली. त्यात चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांचा समावेश आहे. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात त्यांना शपथ दिली. विधानपरिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ५ जागा अजून रिक्त आहेत.

दरम्यान या नियुक्त्यांना विरोध करणारी याचिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई उच्च न्यायालयाने याचिका दाखल केली होती. या प्रकरणी न्यायालयाने निकाल राखून ठेवलेला असताना या नियुक्त्या केल्याचं या याचिकेत म्हटलं होतं. मात्र, राज्यपाल निर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीला कोणत्याही प्रकारची हंगामी स्थगिती नव्हती किंवा सरकारनेही या नियुक्त्या करणार नाही अशी हमी दिली नव्हती. त्यामुळे आम्ही १२ पैकी ७ जणांच्या नियुक्त्या केल्याची माहिती राज्य सरकारने उच्च न्यायालयात दिली. या प्रकरणी अंतिम निर्णय देताना याबाबत आपलं मत देऊ असं उच्च न्यायालयानं आजच्या सुनावणीत सांगितलं.

<><><><><><>

शिक्षणक्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्र यामधील संशोधनांचा मेळ घालण्याच्या दृष्टीनं अनुसंधान राष्ट्रीय संशोधन संस्थेने दोन नवीन उपक्रमांची घोषणा केली आहे. PMECRG म्हणजे प्रधानमंत्री प्रारंभिक

कामगिरी संशोधन अनुदान  आणि MAHA- EV अर्थात  उच्च प्रभावित क्षेत्रामधील प्रगती योजना - इलेक्ट्रिक वाहन योजना अशा या दोन योजना आहेत.  संशोधकांना आपल्या कामगिरीच्या आरंभकाळात नवकल्पनांचा विकास करत  देशाच्या विज्ञान आणि संशोधन क्षेत्रातल्या उत्कृष्टतेसोबत देशाच्या परिवर्ताच्या प्रवासात सामील होता यावं हा PMECRG उपक्रमाचा उद्देश आहे. तर इलेक्ट्रिक वाहनांचे सुटे भाग, बॅटरी सेल आदी भागांशी संबधीत संशोधन आणि उत्पादन यांना चालना देण्यासाठीच्या परिसंस्थेचा विकास हे MAHA- EV  उपक्रमाचे लक्ष्य  आहे.

<><><><><>

परमेश शिवमणी यांनी आज भारतीय तटरक्षक दलाचे २६ वे महासंचालक म्हणून कार्यभार स्वीकारला. शिवमणी हे नेव्हिगेशन आणि दिशादर्शन क्षेत्राचे तज्ञ असून त्यांनी तटरक्षक दलाच्या महत्त्वाच्या सर्व जहाजांवर सेवा बजावली आहे. ते नवी दिल्लीतील राष्ट्रीय सुरक्षा महाविद्यालय तसंच विलिंग्डन इथल्या सुरक्षा सेवा स्टाफ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. २०१९ मध्ये त्यांना राष्ट्रपती पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मिरमधल्या नव्या सरकारचा शपथविधी उद्या सकाळी श्रीनगरमध्ये होणार आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी काल नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांना नवीन सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केलं. इथली राष्ट्रपती राजवट केंद्र सरकारनं परवाच उठवली होती.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आज दोन दिवसीय दौऱ्यासाठी इस्लामाबादला रवाना होणार आहेत. शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. भारताचे परराष्ट्र मंत्री ९ वर्षात पहिल्यांदाच पाकिस्तानमध्ये जात आहेत. या बैठकीदरम्यान पाकिस्तान सोबत कुठलीही द्विपक्षीय चर्चा होणार नसल्याचं जयशंकर यांनी यापूर्वीच स्पष्ट केलंय. भारतासह इराण, कझाकस्तान, चीन, किर्गिज प्रजासत्ताक, पाकिस्तान, रशिया, ताजिकिस्तान आणि उजबेकिस्तान हे ९ देश या संघटनेचे सदस्य आहेत.

<><><><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान सचिव स्तरावरची चर्चा नवी दिल्लीत झाली. संरक्षण सचिव गिरीधर अरमाने आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यात सहभागी झाले होते. यावेळी राजकीय, संरक्षण, सुरक्षा, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाली. भारत प्रशांत क्षेत्रात शांतता, स्थैर्य राखणं तसंच भारत - ऑस्ट्रेलिया सर्वंकष भागिदारीवरही यावेळी चर्चा झाली.

<><><><><><>

भारतात कार्यरत असलेल्या कॅनडाच्या ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना माघारी जाण्याचे आदेश भारतानं दिले आहे. त्यात प्रभारी उच्चायुक्त स्ट्युअर्ट रॉस व्हीलर, उप उच्चायुक्त पॅट्रीक हेबर्ट याशिवाय इतर ४ अधिकाऱ्यांना मायदेशी परतण्याचे आदेश भारतानं दिले आहेत. या सर्वांना शनिवारपर्यंत भारत सोडून जायला सांगितलं आहे. याशिवाय भारतानं कॅनडातील आपल्या उच्चायुक्तांसह अन्य राजनैतिक अधिकाऱ्यांनाही

माघारी बोलावलं आहे. कॅनडातलं विद्यमान सरकार त्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्याची बांधिलकी पाळेल याची खात्री नसल्यानं त्यांना माघारी बोलावण्यात येत असल्याचं भारतानं म्हटलं आहे.

कुठल्याही पुराव्याशिवाय कॅनडातल्या भारतीय उच्चायुक्तांसह इतर अधिकाऱ्यांना लक्ष्य करणं खपवून घेतलं जाणार नाही, असं भारतानं काल कॅनडाच्या प्रभारी उच्चायुक्तांना स्पष्ट केलं. गेल्या सप्टेंबरमध्ये काही आरोप केल्यानंतर कॅनडाचे प्रधानमंत्री जस्टीन ट्रुडो यांनी यासंबंधातले कुठलेही पुरावे सादर केलेले नाही, असं भारतानं म्हटलं आहे.

<><><><><>

अतिवृष्टीने बाधित झालेल्या श्रीलंकेत पावसाचा जोर ओसरेल असा अंदाज आहे. श्रीलंकेच्या हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार बंगालच्या उपसागरात आग्नेय भागात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा पश्चिम वायव्य दिशेला सरकण्याची शक्यता असल्यामुळे हवामान काहीसे निवळेल. दरम्यान श्रीलंकेत पूरग्रस्तांसाठी राष्ट्राध्यक्ष अनुरा दिस्सानायके यांनी ५० मिलीयन श्रीलंकन रुपयांची मदत मंजूर केली आहे. खराब हवामानामुळे दीड लाख नागरिक संकटात आल्याचं श्रीलंकेच्या आपदा व्यवस्थापन केंद्राने म्हटलं आहे. दहा हजार आपदग्रस्तांनी देशभरातल्या ८० मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतला आहे.

<><><><><>

नवी दिल्ली इथं झालेल्या I S S F नेमबाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या सोनम म्हसकर हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात आज रौप्य पदक जिंकलं. बावीस वर्षांच्या सोनमने २५२ पूर्णांक ९

गुण मिळवत आपलं पदक निश्चित केलं. या स्पर्धेत चीनच्या युतिंग हुआंग हिने सुवर्ण तर फ्रान्सच्या ओसियन मुलर हिने कांस्य पदक पटकावलं.

**<><><><><><>**

महिलांच्या टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात आलं आहे. अ गटात काल झालेल्या सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने पाकिस्तानचा पराभव करत उपान्त्य फेरीत प्रवेश केल्यानंतर भारतीय संघ चार गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिला. ऑस्ट्रेलिया पहिल्या तर पाकिस्तान चौथ्या स्थानावर आहे.

**<><><><><><>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची पी. व्ही. सिंधू आज संध्याकाळी महिला एकेरी प्रकाराच्या पहिल्या फेरीत चिनी तैपेईच्या **पै यू पो** हिच्याशी लढत देईल. तर पुरुष दुहेरी प्रकारात भारताचा लक्ष्य सेन याची लढत चीनच्या **लू गुआंग झू** विरुद्ध होईल. महिला दुहेरी प्रकारात रुतपर्णा आणि श्वेतपर्णा पांडा या दोघी **चांग चिंग हुई** आणि **यांग चिंग तुन** या चिनी तैपेई जोडीशी झुंज देतील. तर मिश्र दुहेरी प्रकारात आज संध्याकाळी सतीश कुमार करुणाकरन आणि आद्या वरियाथ यांची इंडोनेशियाच्या रेहान **नौफल कुशारजांतो** आणि **लिसा आयु कुसुमावती** यांच्याशी लढत होईल.

**//<><><><><><>//**